# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गो.वि.ग./म.वि.वि.वि./ 1117 /२०२६ दि. 21/०८/२०२६

## परिपत्रक

विषय:- संस्कृत सप्ताह साजरा करणेबाबत.

संदर्भ:- मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/संस्कृत सप्ताह /परिपत्रक / मवि-१/२०२६/ई.२०३९४०० दि. २०/०८/२०२६

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, भारताच्या प्राचीन परंपरेचा ठेवा म्हणजेच संस्कृत भाषा, संस्कृत भाषेच्या अभ्यासासाठी आणि संशोधनासाठी देशातील आणि विदेशातील विविध अभ्यासक कायम उत्सुक असतात. या भाषेचा प्रचार आणि प्रसारासाठी भारतात आणि विदेशातही विविध संस्था संघटना कार्यरत आहेत, भारतातील आणि विदेशातील विविध शाळा, महाविद्यालये आणि विश्वविद्यालयांमध्ये या भाषेच्या अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाचे कार्य कायम सुरु आहे. महाराष्ट्रात विविध भाषांच्या प्रचारासाठी आणि जागृतीसाठी विविध भाषा दिन साजरे करण्यात येतात.

त्याअनुषंगाने सन २००० या वर्षापासून संस्कृत सप्ताह साजरा केला जात असून सन २०२६ या वर्षी संस्कृत सप्ताह दि. २४ ऑगस्ट, ते दि. ३० ऑगस्ट, २०२६ या कालावधीमध्ये साजरा केला जाणार आहे. या कार्यक्रमातून संस्कृत भाषेविषयी आपल्या भावना प्रगट करण्याचे एक माध्यम समाजातील विद्यार्थ्यांना उपलब्ध होवू शकेल.

करीता संलग्नित संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन मा. प्राचार्य यांनी महाविद्यालयामध्ये दि. २४ ऑगस्ट, ते दि. ३० ऑगस्ट, २०२६ या कालावधीमध्ये संस्कृत सप्ताह साजरा करावे. सदर कार्यक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात यावे.

सहपत्र:- संदर्भीय पत्र संलग्नित.

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई. बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिस/संस्कृत सप्ताह /परिपत्रक /मवि-१/२०२६/ई .२०३९४०० दि-स्वाक्षरीप्रमाणे

## परिपत्रक

विषयः- संस्कृत सप्ताह साजरा करणे बाबत.

वाचा :- संस्कृतभारती विद्यालयीन शिक्षा प्रमुख यांचे पत्र दि.१६.०७.२०२६

उपरोक्त वाचा येथील पत्र दि.१६.०७.२०२६ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

भारताच्या प्राचीन परंपरेचा ठेवा म्हणजेच संस्कृत भाषा, संस्कृत भाषेच्या अभ्यासासाठी आणि संशोधनासाठी देशातील आणि विदेशातील विविध अभ्यासक कायम उत्सुक असतात. या भाषेचा प्रचार आणि प्रसारासाठी भारतात आणि विदेशातही विविध संस्था संघटना कार्यरत आहेत, भारतातील आणि विदेशातील विविध शाळा, महाविद्यालये आणि विश्वविद्यालयांमध्ये या भाषेच्या अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाचे कार्य कायम सुरू आहे. महाराष्ट्रात विविध भाषांच्या प्रचारासाठी आणि जागृतीसाठी विविध भाषा दिन साजरे करण्यात येतात.

याअनुषंगाने सन २००० या वर्षापासून संस्कृत सप्ताह साजरा केला जातो. सन २०२६ या वर्षी संस्कृत सप्ताह दि.२४ ऑगस्ट, ते दि. ३० ऑगस्ट ,२०२६ या कालावधीमध्ये साजरा केला जाणार आहे. त्यामुळे संस्कृत संबंधी अधिकाधिक प्रचार प्रसार होऊन आपल्या मराठी या राज्यभाषेच्या पोषणासाठीही उपयुक्त कार्य होण्यास मदत होणार आहे. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान विज्ञान परंपरेचा प्रचारही होण्यास उपयुक्त वातावरण निमार्ण होईल. या कार्यक्रमातून संस्कृत भाषेविषयी आपल्या भावना प्रगट करण्याचे एक माध्यम समाजातील विद्यार्थ्यांना उपलब्ध होवू शकेल.

या अनुषंगाने दि.२४ ऑगस्ट, ते दि.३० ऑगस्ट ,२०२६ कालावधीत विविध भाषा संवर्धन विषयक कार्यक्रमांच्या माध्यामातून (संदर्भांकित पत्रात नमूद केल्यानूसार) संस्कृत सप्ताह साजरा करण्याबाबत आपल्या कार्यकक्षेतील सर्व संलग्नित महाविद्यालये /शैक्षणिक संस्था यांना तात्काळ सूचित करण्यात यावे.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, राज्य सार्वजनिक विद्यापीठे.

Scanned with OKEN Scanner

॥ ॐ ॥

# संस्कृत-भारती

महाराष्ट्र तथा गोवा प्रान्त कार्यालय :
ए -5, अमोदबन सोसायटी, मुंजाबाचा बोळ, 409-अ, नारायण पेठ, पुणे 411030.
दूरध्वनी क्र. : (020) 24490900

दिनांक : १६/०७/२०२६

मा. डॉ. शैलेश देवळाणकर,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

विषय - संस्कृत सप्ताह साजरा करणे बाबत

महोदय,

भारताच्या प्राचीन परंपरेचा ठेवा म्हणजेच संस्कृत भाषा, संस्कृत भाषेच्या अभ्यासासाठी आणि संशोधनासाठी देशातील आणि विदेशातील विविध अभ्यासक कायम उत्सुक असतात. या भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी भारतात आणि विदेशातही विविध संस्था संघटना कार्यरत आहेत, भारतातील आणि विदेशातीलही विविध शाळा महाविद्यालय आणि विश्वविद्यालयांमध्ये या भाषेच्या अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाचे कार्य कायम चालू आहे. महाराष्ट्रात विविध भाषांच्या प्रचारासाठी आणि जागृतीसाठी विविध भाषा दिन साजरे करण्यात येतात, संस्कृत दिवस साजरा करणे १९६९ या वर्षापासून सुरू झाले आहे. तसेच संस्कृत सप्ताह साजरा करणे २००० या वर्षापासून सुरू झाले. संस्कृत सप्ताह केंद्र शासनाच्या योजनेतून नारळी पौर्णिमेपूर्वीचे तीन दिवस आणि नंतरचे तीन दिवस असे सात दिवस म्हणजेच संस्कृत सप्ताह साजरा करण्यासंबंधी परिपत्रक प्रचारित करण्यात आले आहे. यावर्षी संस्कृत सप्ताह २४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत असणार आहे. महाराष्ट्रातही राज्य सरकारच्या अखत्यारितील सर्व विश्वविद्यालय, महाविद्यालयांमध्ये आणि विविध कार्यालयात संस्कृत सप्ताहाचे आयोजन करण्यात यावे. त्यामुळे संस्कृत संबंधी अधिकाधिक प्रचार प्रसार होऊन आपल्या मराठी या राज्यभाषेच्या पोषणासाठीही उपयुक्त कार्य होण्यास मदत होणार आहे. तसेच राष्ट्रीय शिक्षण नीती २०२० मधील भारतीय ज्ञान विज्ञान परंपरेचा प्रचारही होण्यास उपयुक्त वातावरण निर्माण होईल. या कार्यक्रमांच्या माध्यमातून संस्कृत विषयी आपल्या भावना प्रगट करण्याचे एक माध्यम समाजातील सर्व नागरिकांना मिळेल अशी आशा वाटते. आपल्या कार्यालयाकडून संस्कृत सप्ताह साजरा करण्याविषयी आवश्यक परिपत्रक लवकरात लवकर प्रस्तुत करण्यात यावे, ही विनंती.

* सोबतच्या पत्रात संस्कृत सप्ताहात करण्यायोग्य काही कार्यक्रम सुचवत आहे.

आपला

मा. ग. केळकर

माधव गजानन केळकर
संस्कृतभारती विद्यालयीन शिक्षा प्रमुख
(महाराष्ट्र, गुजरात, गोवा)

Scanned with OKEN Scanner

|| ॐ ||

# संस्कृत-भारती


महाराष्ट्र तथा गोवा प्रान्त कार्यालय :

ए -5, अमोदबन सोसायटी, मुंजाबाचा बोळ, 409-अ, नारायण पेठ, पुणे 411030.

दूरध्वनी क्र. : (020) 24490900


दिनांक : १६/०७/२०२६

संस्कृत सप्ताहात करण्यायोग्य काही कार्यक्रम

विविध शाळा व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धांचे आयोजन (श्लोक पाठांतर, सुभाषित पाठांतर, स्तोत्र पाठांतर, भित्तीचित्र निर्माण, प्रश्नमंजूषा, श्लोक अन्त्याक्षरी, सामान्य ज्ञान स्पर्धा, संस्कृत अनुलेखन इत्यादी), विविध प्रदर्शनी (वस्तू प्रदर्शनी, चित्र प्रदर्शनी, पुस्तक प्रदर्शनी, विज्ञान प्रदर्शनी, दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शनी) मनोरंजन कार्यक्रम (संस्कृत गीतगायन, स्तोत्र गायन, लघुनाटक, पथनाट्य, नाट्यवाचन, स्तोत्र किंवा गीत यावर नृत्य, एकपात्री, समूहगायन, इत्यादी) संस्कृत पुस्तक वितरण, संस्कृत बोधवचन लेखन,

विविध विभागामध्ये संबंधित नावांचे संस्कृत फलकलेखन (कार्यालयः, स्वच्छतागृहम्, सभागृहम्, शाखा किंवा कार्यालय व्यवस्थापकः, प्रवेशद्वारम्, पानजलम्, इत्यादी)

आपल्या कार्यालयाकडून संस्कृत सप्ताह साजरा करण्याविषयी आवश्यक परिपत्रक लवकरात लवकर प्रस्तुत करण्यात यावे, ही विनंती.

मा. ग. केळकर

Scanned with OKEN Scanner